ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार, यांसाठी शिक्षण प्रसार

डॉ.बापूजी साळुंखे

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

**विभाग - राज्यशास्त्र**

बी.ए.भाग—३

सन २०२३—२०२४

**पेपरचे नांव**

## लोकप्रशासन व्यवहार

**प्रकल्प विषय**

## भरतीच्या पध्दती आणि पात्रता

**विदयार्थ्याचे नांव**

**कु.रेणूका दिपक चव्हाण**

पेपर क्र. : 13

रोल नं. : ४९४०

**मार्गदर्शक**

**प्रा.अजय पाटील**

**प्रा.समिक्षा फराकटे**

# प्रतिज्ञापत्र

आम्ही प्रतिज्ञापूर्वक घोषित करतो की, सदरचे संशोधन आमच्या स्वतःच्या प्रयत्नाचे फलित आहे. हे संशोधन यापूर्वी कोणत्याही पदवीसाठी सादर माहितीच्या आधारे लिहिलेले नसून आम्ही स्वतः संशोधन करून व आमच्या मार्गदर्शकांकडून मिळालेल्या माहितीवरून आणि संदर्भ साहित्याचा आधार घेवून तयार करण्यात आले आहे.

ठिकाण:— विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

दिनांक:— २१ मार्च २०२४

| अ.नं. | विदयार्थ्याचे नांव | रोल नं. | सही |
|---|---|---|---|
| १. | रेणूका चव्हाण | 4940 | RDC |
| २. | पल्लवी कोठावळे | 4945 | Rkhaule. |
| ३. | प्रमिला कांबळे | 4941 | Pkamble |
| ४. | समृध्दी मोरे | | Samrudhi |
| ५. | सुकन्या माने | 4948 | [illegible] |
| 6. | शुभम करनुरे | 4943 | [illegible] |

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, कु.रेणूका चव्हाण, पल्लवी कोठावळे, प्रमिला कांबळे, समृध्दी मोरे, सुकन्या माने या विदयार्थिनींनी राज्यशास्त्र विभागाचा सादर केलेला प्रकल्प अहवाल हा लोकप्रशासन व्यवहार विभागामधील भरतीच्या पध्दती आणि पात्रता या विषयाचा आहे. सदर प्रकल्प अहवाल हा मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे व माझ्या माहितीप्रमाणे हा प्रकल्प अहवाल यापूर्वी कोणत्याही पदवीसाठी सादर केलेला नाही.

ठिकाण:— विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर

दिनांक:— २१ मार्च २०२४

मार्गदर्शक

प्रा.अजय पाटील

प्रा.समिक्षा फराकटे

HEAD
DEPARTMENT OF ... SCIENCE
VIVEKANAND COLLEGE, ...
(EMPOWERED AUTONOMOUS)

प्राचार्य

डॉ. आर. आर. कुंभार

प्राचार्य
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

# ऋणनिर्देश

श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद महाविद्यालयाच्या अंतर्गत बी.ए.भाग–३ मधील राज्यशास्त्र विभागातील लोकप्रशासन व्यवहार विभागामधील भरतीच्या पध्दती आणि पात्रता या विषयावरील प्रकल्प सादर करण्याची संधी आम्हांला मिळाली याबद्दल आम्ही शिवाजी विदयापीठ, कोल्हापूर आणि विवेकानंद महाविदयालय, कोल्हापूर यांचे ऋणी आहोत. या प्रकल्पासाठी आम्हांस प्रा.अजय पाटील सर,विभागप्रमुख प्रा.समिक्षा फराकटे मॅडम, प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार व ग्रंथालय विभाग या सर्वांचे प्रोत्साहन व वेळोवेळी मोलाचे मार्गदर्शन मिळाले. त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

# अनुक्रमणिका


| अ.नं. | शिर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | प्रस्तावना | १ |
| २ | प्रकल्पाचा हेतू | २ |
| ३ | भरतीच्या पध्दती | २—४ |
| ४ | भरतीच्या योग्यता | ४—६ |
| ५ | भरतीच्या योग्यता किंवा पात्रता ठरविण्याच्या पध्दती | ६—१० |
| ६ | निष्कर्ष | ११ |
| ७ | संदर्भ सूची | १२ |

# नागरी सेवेतील भरतीच्या पध्दती आणि पात्रता/योग्यता

**प्रस्तावना :—**

भरती:—

नागरी सेवेत कर्मचाऱ्यांची भरती ही गोष्ट अत्यंत महत्वाची मानली जाते. कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीवर प्रशासनाची कार्यक्षमता व यश अवलंबून असते.संपूर्ण प्रशासनाची रचना व कार्य त्यामध्ये नियुक्त केल्या जाणाऱ्या सनदी सेवकावर अवलंबून असते. नागरी सेवेत भरती जेवढी योग्य व आदर्श होईल त्याप्रमाणात नागरी प्रशासकीय रचना आदर्श व कार्यक्षम बनू शकते. तेव्हा कुशल, कार्यक्षम व पात्र अशा कर्मचाऱ्यांची भरती होणे आवश्यक असते.



मार्शल डिमॉक:—

विशिष्ट पदासाठी योग्य प्रकारच्या व्यक्ती मिळविणे म्हणजे भरती होय.

प्रोफेसर एल.डी.व्हाईट:—

नागरी सेवेतील एखादया रिकाम्या पदासाठी उमेदवारांना स्पर्धा परिक्षेत भाग घेण्यासाठी आकर्षिक करणे म्हणजे भरती करणे होय.

## प्रकल्पाचे हेतू:—

१. नागरी सेवेमधील भरतीचा हेतू/उद्देश अभ्यासणे.

२. नागरी सेवेच्या भरतीमधील विविध पध्दतींचा तुलनात्मक पध्दतीने अभ्यास करणे.

३. नागरी सेवेतील भरतीच्या संदर्भातील उमेदवारांच्या पात्रता व योग्यता यांचा अभ्यास करणे

प्राध्यापक विलोबी यांच्यामते नागरी सेवेत भरती करतांना पुढील समस्या विचारात घेणे महत्वाचे ठरते.

१. नागरी सेवेतील नोकरवर्गाची नेमणूक करण्याची सत्ता कोणाकडे असावी?

२. भरती करण्यासाठी कोणत्या पध्दतीचा अवलंब करावा.?

३. कर्मऱ्यांची योग्यता (पात्रता)कोणती असावी आणि योग्यता निश्चित करण्याच्या पध्दती कोणत्या असाव्यात?

४. उमेदवारांची योग्यता निश्चित करणारी यंत्रणा कशी असावी?.

वरील मुद्यांचा विचार करून भरतीविषयी अधिक सखोल अभ्यास करता येईल.

## भरतीच्या पध्दती

राज्य प्रशासनातील सेवकांची भरती करतांना पुढील दोन आधारांचा विचार केला जातो.

### १. राजकीय आधार (लुट पध्दती Spoil System)—

राजकीय आधारावर जेव्हा नोकरवर्गाची भरती होते तेंव्हा त्या पध्दतीला लूट पध्दती किंवा पुरस्कार पध्दती असे म्हणतात. अमेरिकेमध्ये या पध्दतीचा उदय अध्यक्ष जेफरसन यांच्या काळात झाला. सत्तारूढ पक्ष पूर्वीच्या प्रशासकीय कर्मचाऱ्यांना बडतर्फ करून नविन कर्मचारी नियुक्त करतो. म्हणूनच या पध्दतीला लूट पध्दती असे म्हणतात. लूट पध्दती सदोष असल्यामुळे १८८३ साली बंद करण्यात आली

२. विशेष पात्रतेचा आधार योग्यता पध्दती (मेरिट सिस्टीम)

जेव्हा नोकर वर्गाची नेमणूक विशेष पात्रतेच्या आधारे केली जाते तेंव्हा त्या पध्दतीला योग्यता पध्दती किंवा गुणविशेष पध्दती असे म्हणतात. लूट पध्दतीमध्ये अनेक दोष असल्यामुळे योग्यता पध्दतीने सनदी सेवकांची भरती होवू लागली. प्रशासनातील रिकाम्या पदावर नेमणूका करतांना उमेदवाराची योग्यता किंवा पात्रता पाहूनच नेमणूक करणे यास योग्यता पध्दती असे म्हणतात. योग्यता पध्दतीमुळे नागरी सेवेत पात्र, कुशल,कार्यक्षम व योग्य असा नोकर वर्ग नेमला जातो. या पध्दतीमुळे प्रशासनाचा दर्जा सुधारून प्रशासनाला स्थैर्य,गतीमानता व यश प्राप्त होते. नागरी सेवेत तटस्थता, नैतिकता, कार्यक्षमता व पावित्र्य या गोष्टी कायम ठेवण्यासाठी योग्यता पध्दती आवश्यक व उपयुक्त ठरते.

## नागरी सेवेतील कर्मचाऱ्यांच्या भरतीसाठी पुढील दोन प्रकारच्या पध्दती स्विकारल्या जातात.

**१. अंतर्गत किंवा बढतीव्दारे भरती (Recruitment by Promotion):—**

नागरी सेवेच्या प्रशासन विभागात एखादे पद रिकामे झाले तर त्याच विभागातील कनिष्ठ सेवकाला त्या पदावर बढती देवून नियुक्ती केली जाते. संघटनेतील मध्यम आणि कनिष्ठ पातळीवरील रिकामी पदे भरतांना ही पध्दत स्विकारली जाते. या पध्दतीमुळे कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय कामाच्या अनुभवाचा फायदा मिळतो. अनुभवी सेवक वरिष्ठ पदावर नेमल्यामुळे प्रशासनाचा दर्जा टिकून राहतो. अनुभवी कर्मचाऱ्याला वरिष्ठ पदावर नियुक्त केल्यामुळे त्यांना प्रशिक्षणाची गरज नसते. या पध्दतीमुळे नेमणूका होत असल्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये व्देष व मत्सराला स्थान नसते.

**२.बाहय किंवा प्रत्यक्ष भरती (Direct Recruitment) :—**

या पध्दतीमध्ये कनिष्ठ ते वरिष्ठ श्रेणीमधील सर्व रिकामी पदे प्रत्यक्ष भरतीव्दारे भरली जातात. उमेदवारांची पात्रता व योग्यता पडताळून पाहिली

जाते. योग्य अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना सनदी सेवेत नियुक्त केले जाते त्यामुळे हुशार, कार्यक्षम अशा व्यक्तींची नियुक्ती प्रशासनामध्ये होते. परंतू या पध्दतीमुळे प्रशासन कार्याचा अनुभव नसलेल्या व्यक्तींची नेमणूक होत असल्यामुळे प्रशासनाचा दर्जा खालावतो अशी टिका केली जाते. प्रत्यक्ष भरतीची पध्दत अधिक खर्चाची आहे कारण उमेदवारांची स्पर्धा परिक्षा घेणे, निवड झालेल्या उमेदवारांना प्रशिक्षण देणे यासाठी बराच खर्च करावा लागतो.

नागरी सेवेतील कर्मचाऱ्यांच्या भरतीच्या दोन्ही पध्दतींचा अभ्यास केला असता असे आढळून येते की, दोन्हीही पध्दतीमध्ये काही गुण व काही दोष आढळून येतात. त्यामुळे कोणतीही एक पध्दती अधिक चांगली आहे म्हणून तीचा स्विकार करावा असा निष्कर्ष काढता येत नाही नागरी सेवेत कर्मचाऱ्यांची भरती करतांना दोन्हीही पध्दतीचा वापर करणे अधिक हिताचे ठरते. प्रत्यक्ष भरती व बढतीव्दारे भरती अशा दोन्ही पध्दतीने प्रशासनातील रिकामी पदे भरली असता प्रशासनाला दर्जा,स्थैय आणि यश लाभते.

नागरी सेवकांची योग्यता (पात्रता)(Qualifications of Public Servant):-

नागरी सेवेतील कर्मचाऱ्यांची पात्रता किंवा योग्यता ठरविणे ही बाब अत्यंत महत्वाची मानली जाते. कारण कर्मचाऱ्यांच्या गुणवत्तेवर आणि योग्यतेवर प्रशासनाचे यश अवलंबून असते. सामान्यत: नागरी सेवेमध्ये नियुक्त होण्यासाठी उमेदवाराकडे दोन प्रकारची योग्यता आवश्यक असते.

**१. सामान्य योग्यता**

**२. विशेष योग्यता**

**१. सामान्य योग्यता:—**

नागरी सेवेत कर्मचारी म्हणून प्रवेश मिळविण्यासाठी उमेदवाराच्या अंगी पुढील सामान्य पात्रता असावी लागते.

**अ) नागरीकत्व (Citizenship) :—**

नागरी सेवेत भरती करतांना नागरिकत्वाची अट अत्यंत महत्वाची मानली जाते. सनदी सेवकाला प्रशासनात फार मोठी जबाबदारी पार पाडावी

लागते. त्यामुळे अशा सेवकाची नेमणूक करतांना तो त्या देशाचा नागरीक असणे आवश्यक असते.

**ब) रहिवास किंवा वास्तव्य (Residence) :—**

संघराज्य शासन पध्दती असलेल्या देशात (भारत, अमेरिका) नागरी सेवेत भरती करतांना उमेदवाराचे वास्तव्य विचारात घेतले जाते. उमेदवार त्या घटक राज्याचा रहिवासी आहे किंवा नाही हे तपासले जाते. उमेदवार किमान काही वर्षे त्या घटक राज्याचा रहिवासी असावा लागतो.

**क) लिंग (Sex) :—**

आधुनिक राज्यात विशेषत: लोकशाही राज्यात स्त्री पुरूषांना नागरी सेवेमध्ये भरती करतांना समान संधी दिली जाते. सामान्यत: सेवकांची भरती करतांना लिंगभेद न करता समानतेच्या तत्वावर स्त्री पुरूषांना समान संधी देणे योग्य ठरते. भारतीय घटनेने सार्वजनिक सेवांमध्ये स्त्री पुरूषांना समान संधी देण्याचे तत्व स्विकारले आहे.

**ड) वय (Age) :—**

सनदी सेवकांची भरती करतांना वयाची अट लावली जाते देशाने आपल्या सेवेच्या गरजेनूसार वयाची अट लावावी असे किंगस्ले यांचे मत आहे. प्रत्येक देशात भरती संबंधी वयाची अट दोन प्रकारे विचारात घेतली जाते.

**३. विशेष योग्यता (Special Qualification) :—**

उमेदवाराच्या अंगी विशेष योग्यता आहे काय हे पाहणे महत्वाचे ठरते विशेष योग्यता पुढील गोष्टींच्या आधारे निश्चित केली जाते.

**अ) शैक्षणिक पात्रता (Educational Qualification) :—**

नागरी सेवेत उमेदवाराची नियुक्ती करतांना त्याची शैक्षणिक पात्रता पाहिली जाते. काही वेळेस शैक्षणिक पात्रतेबरोबर तांत्रिक पात्रता देखील पाहिली जाते. पदाची जबाबदारी विचारात घेवून शैक्षणिक पात्रतेची अट

निर्धारित केली जाते. भारत, इंग्लंड इत्यादी देशामध्ये भरती करतांना उमेदवाराची शैक्षणिक पात्रता ही अट महत्वाची व आवश्यक मानली जाते.

**ब) कार्याचा अनुभव (Experience):—**

नागरी सेवेत उमेदवारांची भरती करतांना त्यांना कामाचा अनुभव आहे किंवा नाही हे पाहिले जाते. विशेषत: तांत्रिक स्वरूपाच्या सेवांमध्ये कामाचा अनुभव पाहूनच भरती केली जाते. अमेरिकेत उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा उमेदवाराचा पूर्वानुभव अधिक महत्वाचा मानला जातो. याउलट भारतामध्ये पूर्वानुभवापेक्षा शैक्षणिक पात्रतेवर अधिक भर दिला जातो.

**क) तांत्रिक ज्ञान (Technical Knowledge):—**

नागरी सेवेत काही विशिष्ट सेवांसाठी तांत्रिक ज्ञान असणाऱ्या व्यक्तीची गरज असते. उदा. डॉक्टर, इंजिनिअर इत्यादी. अशा पदांवर भरती करतांना उमेदवाराला तांत्रिक ज्ञान आहे किंवा नाही याविषयी पात्रता आजमावली जाते.

**ड) वैयक्तिक गुण (Personal Qualification):—**

नागरी सेवकांची भरती करतांना व्यक्तीगत गूणांची पाहणी केली जाते. प्रमाणिकपणा, निस्वार्थीपणा, सचोटी, दुरदर्शीपणा, कार्यक्षमता, नेतृत्वशैली, विश्वासूपणा, चारित्र्य, वक्तशीरपणा, इत्यादी गुण उमेदवाराच्या अंगी असावे लागतात. लघुत्तरी प्रश्न, मानसशास्त्रीय पध्दती, मुलाखती याव्दारे व्यक्तीगत गुणांची पाहणी करता येते.

## योग्यता किंवां पात्रता ठरविण्याच्या पध्दती

(Methods of Determining Qualifications)

नागरी सेवेत कर्मचाऱ्यांची भरती करतांना उमेदवारांची पात्रता/योग्यता निश्चित करावी लागते. याकरिता विविध परिक्षा घेवून उमेदवाराच्या ठिकाणी पदासाठी लागणारी पात्रता आहे किंवा नाही हे तपासले जाते. उमेदवारांची योग्यता ठरविल्याशिवाय त्यांची भरती करता येत नाही. सामान्यत: पुढील पध्दतीव्दारे उमेदवारांची योग्यता निश्चित करता येते.

१. लेखी परिक्षा **(Written Test) :—**

२. तोंडी परिक्षा **(Oral Test Or Interview) :—**

३. प्रात्यक्षिके **(Performance Test) :—**

४. मानसशास्त्रीय परिक्षा **(Psychological Test) :—**

५. शारीरीक परिक्षा **(Physical Test) :—**

**१. लेखी परिक्षा (Written Test) :—**

बहुतेक सर्व देश नागरी सेवकांची भरती करतांना लेखी परिक्षा घेतली जाते. लॉर्ड मेकॉले यांनी लेखी स्पर्धा परिक्षेचा पुरस्कार केला आहे. लेखी परिक्षा घेताना प्रश्नांचे स्वरूप कसे असावे यावरून लेखी परिक्षेचे दोन प्रकार पडतात.

**अ) निबंधात्मक स्वरूपाची लेखी परिक्षा (Essay Type Test) :—**

**ब) संक्षिप्त उत्तर स्वरूपाची लेखी परिक्षा (Short Answer Test) :—**

**अ) निबंधात्मक स्वरूपाची लेखी परिक्षा (Essay Type Test) :—**

या परिक्षेमध्ये उमेदवारांना प्रश्नांची उत्तरे निबंधात्मक स्वरूपात (सविस्तर) लिहावी लागतात. उमेदवाराने दिलेल्या उत्तरावर त्याची भाषाशैली, विश्लेषण करण्याची पध्दती, तर्कशक्ती, भाषेवरील प्रभूत्व, सामान्य ज्ञान इत्यादी गोष्टींची माहिती मिळते. भारतामध्ये अखिल भारतीय सेवांसाठी ज्या लेखी परिक्षा घेतल्या जातात. त्या निबंधात्मक स्वरूपाच्या असतात. ही पध्दत उपयुक्त असली तरी या पध्दतीमध्ये देखील काही दोष दिसून येतात.

**ब) संक्षिप्त उत्तर स्वरूपाची लेखी परिक्षा (Short Answer Test) :—**

सनदी सेवकांची भरती करतांना होय किंवा नाही, चूक किंवा बरोबर, रिकाम्या जागा भरा असे छोटे प्रश्न विचारून त्यांची योग्यता निश्चित केली जाते. उत्तरे संक्षिप्त असल्यामुळे या पध्दतीला वस्तूनिष्ठ परिक्षा पध्दती असे म्हटले जाते. या पध्दतीत काही दोष आढळून येतात. या परिक्षांमध्ये उमेदवारांच्या बुध्दीमत्तेचे, भाषाशैलीचे, तर्कशक्तीचे मोजमाप करता येत नाही.

प्रोफेसर एम.पी.शर्मा यांच्यामते वरिष्ठ श्रेणीतील उमेदवारांची परिक्षा लेखी पध्दतीने घेवून त्यांची योग्यता ठरवावी आणि कनिष्ठ श्रेणीतील पदांसाठी वस्तूनिष्ठ परिक्षा पध्दती वापरावी.

**२. तोंडी परिक्षा (Oral Test Or Interview):—**

लेखी परिक्षेमुळे उमेदवारांची बौध्दीक पातळी समजते तर तोंडी परिक्षेमुळे उमेदवारांची कार्यक्षमता प्रसंगावधान त्वरीत निर्णय घेण्याची क्षमता यागोष्टींची योग्यता समजते. उमेदवारांच्या व्यक्तीमत्वाची पूर्णपणे कल्पना येण्यासाठी तोंडी परिक्षा आवश्यक ठरते. मुलाखत पध्दती ही आवश्यक व उपयुक्त असली तरी या पध्दतीत काही दोष आढळून येतात.



१. मुलाखत फारच कमी वेळेत घेतली जाते.

२. मुलाखत घेणारे उमेदवारांवर प्रश्नांचा भडीमार करतात त्यामुळे उमेदवार गोंधळून जातो. काहीवेळा ज्या प्रश्नांचा नागरी सेवेशी संबंध नसतो असे प्रश्न विचारले जातात.

३. मुलाखत घेणारे परिक्षक संख्येने जास्त असतील तर उमेदवाराच्या व्यक्तीमत्वासंबंधी त्यांची मते वेगवेगळी असू शकतात.

४. मुलाखत घेणारी व्यक्ती पूर्वग्रहदुषित व पक्षपाती असू शकते त्यामुळे कार्यक्षम उमेदवारांवर अन्याय होतो.

मूर यांच्या मते मुलाखत घेतांना जे प्रश्न विचारले जातात त्यांचे स्वरूप संक्षिप्त असावे. डॉ.फायनर यांनी मुलाखत पध्दतीतील दोष दूर करण्यासाठी उपाय सुचविले आहेत ते पुढीलप्रमाणे

१. मुलाखतीची वेळ वाढवावी

२. मुलाखत घेणारे परिक्षक व्यवसाय क्षेत्रातील तसेच विदयापीठ क्षेत्रातील असावेत.

३. मुलाखतीमध्ये विचारले जाणारे प्रश्न पदाशी संबंधीत विषयापुरते मर्यादीत असावेत.

अलिकडे सामुहीक वादविवाद(Group Discussion) पध्दतीने उमेदवाराच्या व्यक्तीमत्वाची पाहणी केली जाते. त्यामुळे मुलाखतीच्यावेळी जे कृत्रिम वातावरण तयार होते ते यापध्दतीत होत नाही.

**३. प्रात्यक्षिके (Performance Test):—**

विविध प्रात्यक्षिकांचा वापर करून तांत्रिक स्वरूपाच्या सेवांतील रिकामी पदे भरली जातात. उदा. मेकॅनिक, इलेक्ट्रीशीयन, टायपिस्ट, स्टेनोग्राफर्स, इंजिनिअर इत्यादी. उमेदवाराला त्याच्या तांत्रिक ज्ञानासंबंधी प्रात्यक्षिक दयावे लागते व त्याव्दारे त्याचे कौशल्य व कार्यक्षमता आजमावली जाते.

**४. मानसशास्त्रीय परिक्षा (Psychological Test):—**

आधुनिक काळात उमेदवारांची मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून चाचणी घेतली जाते. उमेदवारांची बुध्दीमत्ता आणि प्रवृत्ती यांचे ज्ञान होण्यासाठी मानसशास्त्रीय कसोटया लावून उमेदवाराची भरती परिक्षा घेतली जाते. ही पध्दत प्रथम अमेरिकेत सुरू झाली आता सर्वच देशात ही पध्दत स्विकारली जाते. डॉ.फायनर यांच्या मते मानसशास्त्रीय कसोटया दोन प्रकारच्या असतात.


**अ. बुध्दीमत्तेची चाचणी (Intelligence Test):—**

या चाचणीव्दारे उमेदवाराच्या बुध्दीमत्तेचा बुध्यांक (IQ) काढला जाता. बुध्यांकावरून उमेदवाराची बौध्दीक कुवत, हुशारी समजून येते. त्यामुळे त्याची निवड करणे अधिक सूलभ होते.

### ब. प्रवृत्तीची चाचणी (Aptitude Test) :—

मानसशास्त्रीय पध्दतीव्दारे उमेदवाराची वृत्ती, मनोवृत्ती समजून येते. त्याचा कोणत्या व्यवसायाकडे कल आहे हे लक्षात आले तर त्याची योग्य पदासाठी निवड करता येते. तसेच उमेदवाराला आपल्या आवडीच्या क्षेत्रात नोकरी मिळाल्याने तो अधिक जोमाने काम करतो.

### ५. शारीरीक परिक्षा (Physical Test) :—



बौध्दीक पात्रतेबरोबरच उमेदवाराकडे शारिरीक पात्रता असणे महत्वाचे ठरते. उमेदवार बौध्दीक व शारीरिक दृष्टया समर्थ असेल तरच तो प्रशासनामध्ये उत्तम कार्य करू शकतो. त्यामुळे उमेदवाराची लेखी व तोंडी परिक्षा झाल्यानंतर त्याची वैद्यकिय तपासणी तसेच शारीरिक क्षमता तपासणी केली जाते उदा.सैन्यदल, पोलीसदल अशा क्षेत्रातील रिकामी पदे भरताना शारिरीक परिक्षा घेतली जाते. अशा प्रकारे नागरी सेवेत कर्मचाऱ्यांची भरती करतांना उमेदवारांची योग्य ठरविण्यासाठी विविध प्रकारच्या पध्दतींचा अवलंब केला जातो.

# निष्कर्ष

- हा प्रकल्प तयार करतांना नागरी सेवेमधील भरतीचे सामान्य नागरिकांना सेवा पूरविण्याच्या दृष्टीने असलेले महत्व लक्षात आले
- नागरी सेवेतील भरतीसाठी आवश्यक सामान्य योग्यता व विशेष योग्यता कोणत्या असतात याची माहिती मिळाली.
- नागरी सेवेतील भरतीसाठी वापरल्या जाणाऱ्या प्रचलित पध्दतींचा अभ्यास करता आला.
- नागरी सेवेतील भरतीसाठी योग्यता किंवा पात्रता ठरविण्याच्या विविध पध्दतींचा गुणदोषांसह अभ्यास करता आला व त्यावर प्रशासनाची कार्यक्षमता व यश अवलंबून असते हे लक्षात आले.

ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार, यांसाठी शिक्षण प्रसार

डॉ. बापूजी साळुंखे

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

विभाग राज्यशास्त्र

बी.ए. भाग ३

सन २०२३—२०२४

पेपरचे नांव — तुलनात्कम शासन आणि राजकारण

## प्रकल्प विषय — अमेरिकेतील डेमोक्रेटिक आणि रिपब्लिकन पक्षाची तुलना

विद्यार्थ्यांचे नांव — कु. रेणुका चव्हाण, कु. प्रमिला कांबळे, कु. शुभम करनुरे कु. पल्लवी कोठावळे, कु. सुकन्या माने

पेपर क्र. १२

मार्गदर्शक

प्रा. समिक्षा फराकटे

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, कु. रेणुका चव्हाण, कु. प्रमिला कांबळे, कु. शुभम करनुरे कु. पल्लवी कोठावळे, कु. सुकन्या माने या विद्यार्थ्यांनी राज्यशास्त्र विभागाचा सादर केलेला प्रकल्प अहवाल हा तुलनात्मक शासन आणि राजकारण. अमेरिकेतील डेमोक्रेटिक आणि रिपब्लिकन पक्षाची तुलना या विषयाचा आहे. सदर प्रकल्प अहवाल हा मार्गदर्शकांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला आहे.

मार्गदर्शक :

प्रा. समिक्षा फराकटे

HEAD
DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(EMPOWERED AUTONOMOUS)

प्राचार्य

डॉ. आर. आर. कुंभार

प्राचार्य
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

# ऋणनिर्देश

श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद महाविद्यालयाच्या अंतर्गत बी.ए. भाग –३ मधील राज्यशास्त्र विभागातील अमेरिकेतील डेमोक्रेटिक आणि रिपब्लिकन पक्षाची तुलना या विषयांवरील प्रकल्प सादर करण्याची संधी आम्हाला मिळाली या बद्दल आम्ही शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. आणि विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर यांचे ऋणी आहोत. या प्रकल्पासाठी आम्हास प्रा. समिक्ष फराकटे, प्रा. डॉ. आर. आर. कुंभार व ग्रंथालय विभाग या सर्वांचे प्रोत्साहन व वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले त्याद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

# अनुक्रमाणिका


| अ. क्र. | शिर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १ | कॉलेजचे नांव | ०१ |
| ०२ | प्रतिज्ञापत्र | ०२ |
| ०३ | प्रमाणपत्र | ०३ |
| ०४ | ऋणनिर्देश | ०४ |
| ०५ | संशोधनाचे उदिष्ट आणि प्रश्न | ०५ |
| ०६ | प्रस्तावना | ०६ |
| ०७ | अमेरिकेतील डेमोक्रेटिक पक्षाची माहिती | ०७ |
| ०८ | अमेरिकेतील डेमोक्रेटिक पक्षाची विचारसरणी | ०८ |
| ०९ | अमेरिकेतील डेमोक्रेटिक पक्षाची रचना | ०९ |
| १० | अमेरिकेतील डेमोक्रेटिक आणि रिपब्लिकन पक्षांतील फरक | १० |
| ११ | अमेरिकेतील डेमोक्रेटिक आणि रिपब्लिकन पक्षांतील साम्य | ११ |
| १२ | अमेरिकेतील रिपब्लिकन पक्षांची माहिती | १२ |
| १३ | अमेरिकेतील रिपब्लिकन पक्षांची विचारसरणी | १३ |
| १४ | अमेरिकेतील रिपब्लिकन पक्षांची रचना | १४ |
| १५ | निष्कर्ष | १५ |
| १६ | संदर्भग्रंथसुची | १६ |

## संशोधनाची उदिष्टे

- अमेरिकेतील डेमोक्रेटिक आणि रिपब्लिकन पक्षाचा अभ्यास करणे.
- अमेरिकेतील डेमोक्रेटिक आणि रिपब्लिकन पक्षाची रचना आणि विचारसरणी अभ्यासणे.
- अमेरिकेतील डेमोक्रेटिक आणि रिपब्लिकन पक्षातील साम्य आणि फरक अभ्यासणे

## संशोधनाचे प्रश्न

- अमेरिकेतील डेमोक्रेटिक आणि रिपब्लिकन पक्षाची स्थापना कधी झाली?
- अमेरिकेतील डेमोक्रेटिक आणि रिपब्लिकन पक्षाची रचना आणि विचारसरणी काय आहे?
- अमेरिकेतील डेमोक्रेटिक आणि रिपब्लिकन पक्षातील साम्य आणि फरक काय आहे?

## प्रस्तावना

अमेरिकेची संयुक्त संस्थाने किंवा युनाइटेड स्टेटस ऑफ अमेरिका हा उत्तर अमेरिका खंडातील देश आहे. ४ जुलै इ.स. १७७६ रोजी अमेरिकेला ब्रिटिनपासून स्वातंत्र्य मिळाले अमेरिकत अध्यक्ष शासन पद्धत आहे. अमेरिकेची राजधानी वाशिंग्टन डी. सी. आहे. अमेरिकेत ५० राज्य आहेत. १९ नोव्हेंबर १४९३ रोजी ख्रिस्तोफर कोलंबस या युरोपीयन दर्यावर्दीला अमेरिकेचा शोध लागला. डॉलर हे अमेरिकेचे चलन आहे. अमेरिकेमध्ये द्विपक्ष पद्धती आहेत. डेमोक्रेटिक आणि रिपब्लिकन पक्ष. अमेरिकेच्या कायदेमंडळाला कॉंग्रस असे म्हणतात. सिनेट हे वरीष्ठ सभागृह आहे. आणि प्रतिनिधी हे कनिष्ठ सभागृह आहे.

## अमेरिकेतील डेमोक्रेटिक पक्षाची माहिती:–

डेमोक्रॅटिक पक्षाची स्थापना 1828 मध्ये झाली. न्यूयॉर्कच्या मार्टिन व्हॅन ब्युरेन यांनी टेनेसीच्या अँड्र्यू जॅक्सनला निवडून आणण्यासाठी एक

नवीन पक्ष म्हणून स्थापन केलेल्या राज्य संघटनांची युती तयार करण्यात मध्यवर्ती भूमिका बजावली. डेमोक्रॅटिक पक्षाला जगातील सर्वात जुना सक्रिय राजकीय पक्ष म्हटले जाते. राष्ट्रीय बँक आणि उच्च दरांना विरोध करताना पक्षाने विस्तारित राष्ट्रपती सत्तेचे समर्थन केले गुलाम राज्यांचे हित , कृषीवाद , आणि भौगोलिक विस्तारवाद , 1860 मध्ये गुलामगिरीवर त्याचे विभाजन झाले आणि 1860 ते 1910 दरम्यानच्या पन्नास वर्षांत केवळ दोनदाच अध्यक्षपद जिंकले , जरी त्या कालावधीत एकूण चार वेळा लोकप्रिय मते जिंकली . 19व्या शतकाच्या उत्तरार्धात, ते उच्च दरांना विरोध करत राहिले आणि सुवर्ण मानकांवर तीव्र अंतर्गत वादविवाद झाले . 20 व्या शतकाच्या सुरुवातीस, वुड्रो विल्सनने 1912 आणि 1916 मध्ये व्हाईट हाऊस जिंकून , प्रगतीशील सुधारणांना पाठिंबा दिला आणि साम्राज्यवादाचा विरोध केला .

## अमेरिकेतील डेमोक्रेटिक पक्षाची विचारसरणी :–

डेमोक्रेटिक हा पक्ष अमेरिकेतील सर्वात जुना पक्ष आहे. तो सुधारणावादी विचारणाचा पुरस्कर्तो आहे. आर्थिक बाबतीत वंचित

नागरिकांच्या बाजूने उभा राहतो. सामाजिक बाबीत राज्याने नागरिकांच्या व्यक्तिगत जीवनांत हस्तक्षेप करू नये अशा उदारमतवादी विचाराला पक्ष मानतो. पक्षाचे चिन्ह गाढव आहे. संघराज्य वादी गटांनी १७९८ जेफरसन यांच्या पक्षाने औपचारिकरित्या डेमोक्रेटिक रिपब्लिकन हे नांव स्विकरले. सलग राष्ट्रध्यक्ष पद हे डेमोक्रेटिक रिपब्लिकन पक्षाकडे राहिले. इ.स. १८०० मध्ये जेफरसन हे राष्ट्रध्यक्ष बनले १८२४ पर्यंत सलग राष्ट्रध्यक्ष पद हे डेमोक्रेटिक रिपब्लिकन पक्षाकडे राहिले. बेरोजगार आणि वयोवृद्ध यांच्यासाठी भत्ता देणे. जागतिक तापमान बद्दाविद्ध आणि पर्यावरण संरक्षण. श्रीमंताकडून अधिक कर अकारणे.

## अमेरिकेतील डेमोक्रेटिक पक्षाची रचना :—

प्रत्येक अध्यक्ष निवडणूकीच्या वर्षी म्हणजे ४ वर्षातून एकदा डोमोक्रेटिक आणि रिपब्लिकन पक्षाचे सदस्य राष्ट्रीय सभा भरतात. डोमोक्रेटिक पक्षाच्या या राष्ट्रीय सभेमध्ये पक्षाचे साधारण चार हजार प्रतिष्ठित प्रतिनिधी सहभागी होतात. यामध्ये कॉंग्रसमधील पक्षाचे सदस्य, राज्याचे डेमोक्रेटिक पक्षाचे गर्व्हनरस आणि पक्षाच्या राष्ट्रीय

कार्यकारणीचे सदस्य असतात. चाळीसपेक्ष अधिक राज्यातील पक्षांतर्गत निवडणूकामधून या कन्व्हेशन मध्ये प्रतिनिधी पाठवले जातात. हि निवडणूक डेमोक्रेटिक पक्षात प्रमाणशीर मतदान पद्धतीने होते.

## अमेरिकेतील डेमोक्रेटिक पक्षाची आणि रिपब्लिक पक्ष फरक

| अ.क्र. | अमेरिकेतील डेमोक्रेटिक पक्ष | अमेरिकेतील रिपब्लिक पक्ष |
|---|---|---|
| १ | डेमोक्रेटिक पार्टी व यु.एस.ए हा जगातील सर्वात जुना सक्रीय राजकीय पक्ष आहे रिपब्लिकन पक्षाचा हा प्रमुख प्रतिस्पर्धी पक्ष आहे. | रिपब्लिक पार्टी ज्याला ग्रॅंड ओल्ड पार्टी म्हणून ओळखले जाते युनायटेड स्टेस ऑफ अमेरिकामधील दोन प्रमुख समकालीन राजकीय पक्षांपैकी एक आहे. |
| २ | डेमोक्रेटिक पार्टी व यु.एस.ए स्थापना ८ | रिपब्लिक पार्टी यु.एस.ए |

| | | |
|---|---|---|
| | जानेवारी १८२८ रोजी झाली. | स्थापना २० मार्च १८५४ रोजी झाली. |
| ३ | डेमोक्रेटसचे कडक बंदुकीच्या कायदयांचे समर्थन करतात. | रिपब्लिकन बंदुकीच्या कडक कायदयांचे समर्थन करीत नाहीत. |
| ४. | डेमोक्रेटसचे प्रतिनिधित्व करणारा रंग निळा आहे. | रिपब्लिकनचे प्रतिनिधित्व करणारा रंग लाल आहे. |

अमेरिकेतील डेमोक्रेटिक पक्षाची आणि रिपब्लिक पक्षांतील साम्य :—

| अ.क्र. | अमेरिकेतील डेमोक्रेटिक पक्षांमधील साम्य | अमेरिकेतील रिपब्लिक पक्षांमधील साम्य |
|---|---|---|
| १ | लोकशाही हा शासनाचा एक प्रकार आहे. ज्यामध्ये सर्व पात्र नागरिकांना प्रस्ताव, विकास आणि कायदयांच्या निर्मितीमध्ये प्रत्यक्षपणे किंवा निवडून आलेल्या प्रतिनिधींदवारे समान सहभागाचा अधिकार आहे. अगदी सोप्या भाषेत सांगायचे तर, हा सरकारचा एक प्रकार आहे जिथे लोक स्वत:चे सरकार निवडतात आणि बहुसंख्य नियमांचा आवाज | आज वापरला जाणारा प्रजासत्ताक हा शब्द प्रतिनिधिक लोकशाहीला सूचित करतो ज्यामध्ये निवडून आलेले राज्य प्रमुख, जसे की अध्यक्ष, मर्यादित कालावधीसाठी सेवा देतात. प्रजासत्ताकातही, बहुसंख्य लोकांचा आवाज आहे जो निवडलेल्या प्रतिनिधिंदवारे राज्य करतो, |

| | | |
|---|---|---|
| | एकदा बहूसंख्य प्रस्थापित झाले की अल्पसंख्याकांना काहीही म्हणायचे नसते. | तथापि मूलभूत अधिकारांची एक सनद किंवा घटना आहे जी अल्पसंख्यांकांना पूर्णपणे प्रतिनिधित्व न करता किंवा अधिलिखित होण्यापासून संरक्षण करते. |

## अमेरिकेतील रिपब्लिक पक्षांची माहिती :—

रिपब्लिकन पक्षाचा उदय १८५० दशकांत झाला. यु.एस.ए. च्या नवीन प्रदेशामध्ये गुलामगिरी ही पद्धत लागू करू नये या विचाराने अनेक नेते व त्यांचे पाठीराखे एकत्र आले यामध्ये १८५४ मधील यांनी एक स्वंतत्र पक्ष सुरू करण्याचे ठरविले आणि जॅकसन मिशीगन येथे झालेल्या सभेत पक्षाची घोषणा करण्यात आली. पक्षाने पहिली अध्यक्षीय निवडनूक १८५६ मध्ये लढली. अध्यक्षीय निवडनुकीच्या प्रचारात यु.एस.ए तुन गुलामगिरी संपविण्याचे अहवान कॉंग्रसला केले.

## अमेरिकेतील रिपब्लिक पक्षांची विचारसरणी :—

रिपब्लिकन पक्ष यु.एस.एत संघटित राजकीय विरोध करणारा पहिला पक्ष होता. हा पक्ष सध्या विकेंद्रीत शासनाचा पुरस्कार करतो. म्हणजे राज्यांवर आणि स्थानिक शासनावर संघराज्याच्या शासनाने नियंत्रण कमीत कमी असले पाहिजे असे मानातो. राष्टाच्या सुरक्षितेसाठी

लोकांच्या वैयक्तिक आयुष्याचे नियमन करण्यास या पक्षाला राज्याला हक्क आहे असे रिपब्लिकन पक्षाचे मत आहे.

## अमेरिकेतील रिपब्लिक पक्षांची रचना:—

दर चार वर्षांनी रिपब्लिकन पक्षाची राष्ट्रीय कन्व्हेशनमध्ये पक्षाचा अध्यक्षीय उमेदवार निवडला जातो. त्यामध्ये साधारण दोन हजार सदस्य असतात. १९७० च्या दशकात डेमोक्रेटिक पक्षाने राज्यमध्यल्या प्राथमिक निवडूकातून राष्ट्रीय कन्व्हेशनचे प्रतिनिधी निवडण्याचा पद्धत अवलंबिल्या आहेत. रिपब्लिकन पक्षाने ही पद्धत स्विकारली. राज्यामधील प्राथमिक निवडणूकीत ज्या अध्यक्ष उमेदवाराला सर्वाधिक मते मिळतात. त्या उमेदवाराला त्या राज्यातील पक्षाचे सर्व कन्व्हेशन प्रतिनिधींचा पाठिंबा मिळतो.

# निष्कर्ष

आम्ही अभ्यासकानी डेमोक्रेटिक आणि रिपब्लिकन पक्षाचा अभ्यास केला व पक्षाची स्थापना, पक्षाची रचना समजून घेतली तसेच या दोन्ही पक्षातील साम्य आणि भेद फरक याचा अभ्यास केला. या अभ्यासावरुन असे लक्षात आले की डेमोक्रेटिक पक्ष हा अमेरिकेतील सर्वात जुना पक्ष आहे. पण तो सुधारणावादी विचारांचा पुरस्कर्ता आहे हा पक्ष वंचीत लोकांच्या बाजूने उभा राहणारा आहे. विशेष म्हणजे हा पक्ष जागतिक तापमान विरुद्ध आवाज उठविणारा आहे. म्हणजेच पर्यावरण संरक्षणाचा विचार करणारा आहे.

डेमोक्रेटिक पक्षात लोक स्वतःचे सरकार निवडतात तर रिपब्लिकन पक्षात निवडलेले प्रतिनिधी द्वारे राज्य चालविले जाते.

ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार,यांसाठी शिक्षण प्रसार

डॉ.बापूजी साळुंखे

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## विभाग राज्यशास्त्र

बी.ए. भाग ३

सन २०२३–२०२४

पेपरचे नांव : *भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था : महाराष्ट्राचा विशेष संदर्भ*

प्रकल्प विषय : जिल्हा परिषद समित्यांची रचना, अधिकार, कार्ये

**विद्यार्थ्यांचे नांव : कु. रेणूका चव्हाण, कु.प्रमिला कांबळे, कु. शुभम करनुरे, कु. पल्लवी कोठावले, कु. सुकन्या माने.**

पेपर क्रं. १५

मार्गदर्शक

प्रा. समिक्षा फराकटे

# प्रतिज्ञापत्र

आम्ही प्रतिज्ञापूर्वक घोषित करतो की, सदरचे संशोधन आमच्या स्वत:च्या प्रयत्नाचे फलित आहे. हे संशोधन यापूर्वी कोणत्याही पदवीसाठी सादर माहितीच्या आधारे लिहिलेले नसून आम्ही स्वत: संशोधन करून व आमच्या मार्गदर्शकाकडून मिळालेल्या माहितीवरून आणि संदर्भ साहित्याचा आधार घेऊन तयार करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | विद्यार्थाचे नांव | रोल नं | सही |
|---|---|---|---|
| 1 | रेणूका चव्हाण | 4940 | R.D.C |
| 2 | प्रमिला कांबळे | 4941 | [illegible] |
| 3 | शुभम करनुरे | 4943 | [illegible] |
| 4 | पल्लवी कोठावळे | 4945 | Kothavle. |
| 5 | सुकन्या माने | 4948 | S.P.M |

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, कु. रेणुका चव्हाण, कु. प्रमिला कांबळे, कु. शुभम करनुरे, कु. पल्लवी कोठावळे, कु सुकन्या माने या विद्यार्थ्यांनी राज्यशास्त्र विभागाचा सादर केलेला प्रकल्प अहवाल हा भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था : महाराष्ट्राचा विशेष संदर्भ जिल्हा परिषदेतील समित्यांची रचना, अधिकार आणि कार्ये या विषयाचा आहे. सदर प्रकल्प अहवाल हा मार्गदर्शकाच्या मागदर्शनाखाली पूर्ण केला आहे.

मार्गदर्शक :

प्रा. समिक्षा फराकटे
HEAD
DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE
VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
(EMPOWERED AUTONOMOUS)

प्राचार्य :

डॉ. आर. आर. कुंभार
प्राचार्य
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.
(अधिकारप्रदत्त स्वायत्त)

# ऋणनिर्देशक

श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या विवेकानंद महाविद्यालयाच्या अंतर्गत बी. ए. भाग—३ मधील राज्यशास्त्र विभागातील जिल्हा परिषद समित्यांच्या रचना, अधिकार आणि कार्ये या विषयावरील प्रकल्प सादर करण्याची संधी आम्हाला मिळाली याबद्दल आम्ही शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, आणि विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर यांचे ऋणी आहोत. या प्रकल्पासाठी आम्हास प्रा. समिक्षा फराकटे, प्रा. डॉ. आर आर कुंभार आणि ग्रंथालय विभाग या सर्वांचे प्रोत्साहन व वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले त्याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

# अनुक्रमाणिका


| अ. क्र. | शिर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | कॉलेजचे नांव | 01 |
| २ | प्रतिज्ञापत्र | 02 |
| ३ | प्रमाणपत्र | 03 |
| ४ | ऋणनिर्देशक | 04 |
| ५ | जिल्हा परिषद म्हणजे काय | 06 |
| ६ | जिल्हा परिषदेच्या समित्यांची रचना | 07 |
| ७ | जिल्हा परिषदेची रचना | 08 |
| ८ | जिल्हा परिषदेचे अधिकार | 09 |
| ९ | जिल्हा परिषदेचे कार्ये | 09 |
| १० | निष्कर्ष | 10 |

# अनुक्रमाणिका


| अ. क्र. | शिर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | कॉलेजचे नांव | 01 |
| २ | प्रतिज्ञापत्र | 02 |
| ३ | प्रमाणपत्र | 03 |
| ४ | ऋणनिर्देशक | 04 |
| ५ | जिल्हा परिषद म्हणजे काय | 06 |
| ६ | जिल्हा परिषदेच्या समित्यांची रचना | 07 |
| ७ | जिल्हा परिषदेची रचना | 08 |
| ८ | जिल्हा परिषदेचे अधिकार | 09 |
| ९ | जिल्हा परिषदेचे कार्ये | 09 |
| १० | निष्कर्ष | 10 |

## प्रश्न :— जिल्हा परिषदेच्या समित्यांची रचना, अधिकार व कार्ये




### जिल्हा परिषद म्हणजे काय ?

महाराष्ट्र राज्यात सध्या ३६ जिल्हे असून ३४ जिल्हा परिषदा आहेत.परिषद ही पंचायतराजमधील महत्त्वाची संस्था असून त्यातील शिखर संस्था म्हणून ओळखली जाते. वसंतराव नाईक समितीच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समितीअधिनियम इ.स. १९६१ कलम क्र.६ नुसार प्रत्येक जिल्हयासाठी नागरी जिल्हे सोडून एक जिल्हा परिषद स्थापन करण्यात आली. महाराष्ट्रात जिल्हा परिषदेची स्थापना १ मे, इ.स. १९६२ रोजी करण्यात आली आहे.

## जिल्हा परिषदेच्या समित्यांची रचना :—

### 1. स्थायी समिती [स्थायी स्थायी]

- ही जिल्हा परिषदेची प्राथमिक समिती म्हणून काम करते. अध्यक्ष हे समितीच्या 14 सदस्यांपैकी एक आहेत.
- पदसिद्ध सदस्यांमध्ये विषय समिती अध्यक्ष आणि सदस्यांचा समावेश होतो.
- या समितीचे पदसिद्ध अध्यक्ष अध्यक्ष असतात.
- 'स्थायी समिती'चे सचिव हे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आहेत.

### 2. कृषी समिती [कृषी प्रदेश]

- कृषी समिती अकरा सदस्यांची असते.
- या समितीचे सचिव हे कृषी अधिकारी आहेत.
- ही समिती कृषी प्रात्यक्षिके आणि सुधारणा, पीक स्पर्धा, पीक मोहीम, पीक संरक्षण उपाय आणि बियाणे, खते आणि कृषी अवजारांचे वितरण हाताळते.
- या समितीकडे वितरण, विषारी वनस्पती नष्ट करणे, गोदामे बांधणे, व्यवस्था करणे आदी कामे आहेत.

### ३. पशुसंवर्धन समिती [पशुसंवर्धन समिती]

- पशुसंवर्धन समितीमध्ये नऊ सदस्यांचा समावेश आहे. या समितीचे सचिव पशुसंवर्धन अधिकारी आहेत.
- या समितीच्या कर्तव्यांमध्ये शेळ्या, मेंढ्या, कोंबड्या आणि डुक्करांच्या संगोपनासाठी प्रोत्साहन देणे, पशुवैद्यकीय दवाखाने बांधणे, रोग प्रतिकारशक्ती विकसित करणे, घोडे आणि गाढवांसारख्या प्राण्यांची उपयुक्तता वाढवणे, पशु प्रदर्शन भरवणे आणि बरेच काही समाविष्ट आहे.

### ५. आरोग्य समिती [आरोग्य समिती]

- या समितीमध्ये नऊ सदस्य असून, जिल्हा वैद्यकीय अधिकारी त्याचे सचिव म्हणून काम पाहतात.

# जिल्हा परिषदेची रचना

जिल्हा परिषदेची रचना, ज्याला जिल्हा परिषद किंवा जिल्हा पंचायत म्हणूनही ओळखले जाते, अनेक देशांमध्ये स्थानिक प्रशासनासाठी एक महत्त्वपूर्ण फ्रेमवर्क बनते. यामध्ये जिल्ह्यातील विविध प्रशासकीय घटकांमधून निवडून आलेल्या प्रतिनिधींचा समावेश असतो, ग्रामीण विकास, सार्वजनिक सेवा आणि कल्याणाशी संबंधित महत्त्वाचे निर्णय घेण्यासाठी जबाबदार प्रशासकीय मंडळ तयार करते. ही श्रेणीबद्ध मांडणी हे सुनिश्चित करते की स्थानिक समुदायांचा त्यांच्या जीवनावर थेट परिणाम करणारी धोरणे आणि उपक्रम तयार करण्यात एक आवाज आहे, प्रभावी प्रशासन आणि तळागाळातील सक्षमीकरण वाढवणे.

भारतातील जिल्हा स्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्था असलेल्या जिल्हा परिषदेच्या रचनेत साधारणपणे खालील घटकांचा समावेश होतो:

- **सदस्य:** जिल्हा परिषदेत निवडून आलेले सदस्य असतात जे जिल्ह्यातील विविध मतदारसंघांचे प्रतिनिधित्व करतात. हे सदस्य नियमितपणे, साधारणपणे दर पाच वर्षांनी होणाऱ्या प्रत्यक्ष निवडणुकांद्वारे निवडले जातात.
- **अध्यक्ष:** जिल्हा परिषदेचे अध्यक्ष निवडून आलेल्या सदस्यांमधून निवडले जातात. अध्यक्ष सभांचे अध्यक्षस्थान करतात आणि विविध मंचांवर जिल्हा परिषदेचे प्रतिनिधित्व करतात.
- **उपाध्यक्ष:** जिल्हा परिषदेत एक उपाध्यक्ष देखील असतो जो अध्यक्षांना पाठिंबा देतो आणि त्यांच्या अनुपस्थितीत जबाबदारी घेतो.
- **स्थायी समित्या :** जिल्हा परिषदेचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी विविध स्थायी समित्या स्थापन केल्या जातात. या समित्या आरोग्य, शिक्षण, कृषी, वित्त आणि सार्वजनिक बांधकाम अशा विविध क्षेत्रांमध्ये तज्ञ आहेत. या समित्यांवर देखरेख करण्यासाठी आणि विशिष्ट समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि शिफारसी करण्यासाठी सदस्यांची नियुक्ती केली जाते.
- **प्रशासकीय कर्मचारी:** जिल्हा परिषदेकडे प्रशासकीय कर्मचारी आहेत जे संस्थेच्या दैनंदिन कामकाजात मदत करतात.

## जिल्हा परिषदेचे अधिकार

भारतातील जिल्हा स्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून जिल्हा परिषद काही अधिकार आणि जबाबदाऱ्या सांभाळते. येथे जिल्हा परिषदेचे काही प्रमुख अधिकार आहेत:

- जिल्हा स्तरावर नियोजन आणि विकास.
- स्वतःचे बजेट तयार आणि व्यवस्थापित करण्यासाठी आर्थिक स्वायत्तता.
- स्थानिक स्वराज्य संस्थांवर नियंत्रण आणि पर्यवेक्षण.
- आरोग्यसेवा, शिक्षण, स्वच्छता इत्यादी सार्वजनिक सेवांचे वितरण.
- सामाजिक कल्याण कार्यक्रम आणि उपक्रमांची अंमलबजावणी.
- प्रभावी प्रशासनासाठी सरकारी विभागांशी समन्वय
- विकास उपक्रम आणि योजनांचे निरीक्षण आणि मूल्यमापन

## जिल्हा परिषदेची कार्ये

जिल्हा परिषदा स्थानिक प्रशासनाचे महत्त्वपूर्ण स्तंभ म्हणून काम करतात, ग्रामीण भागांच्या विकासात आणि कल्याणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. या प्रशासकीय संस्थांना सामाजिक-आर्थिक कार्यक्रमांचे नियोजन आणि अंमलबजावणी, स्थानिक संसाधनांचे व्यवस्थापन, अत्यावश्यक सेवा प्रदान करणे आणि ग्रामीण विकासाला चालना देणे यासह अनेक प्रमुख कार्ये सोपविली जातात. त्यांच्या विविध जबाबदाऱ्यांद्वारे, जिल्हा परिषद जीवनाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि ते शासन करत असलेल्या जिल्ह्यातील समुदायांचे सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने कार्य करते.

### जिल्हा परिषदेची कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

- जिल्हा परिषद कायद्यात संस्थेच्या कर्तव्यांची यादी आहे.
- ग्रामीण आणि कृषी क्षेत्राच्या विकासासाठी कार्यक्रम राबविणे हे जिल्हा परिषदेचे एक महत्त्वाचे कार्य आहे.

- शिक्षण, आरोग्य, दळणवळण या क्षेत्रांत सेवा पुरविण्याची जबाबदारीही जिल्हा परिषदेची आहे.
- ही संस्था शेती आणि उद्योगाच्या विकासाची काळजी घेतात.
- शिक्षण आणि संवाद कार्यक्रमाच्या विस्तारात जिल्हा परिषद योगदान देते
- तसेच, ते सिंचन आणि सहकारी उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत आहेत.
- जिल्हा परिषदेचे प्रत्येक कार्य हे अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या प्रगतीवर लक्ष केंद्रित करणे आहे.
- महाराष्ट्रात, जिल्हा परिषद ही अधिकृत आणि महत्त्वपूर्ण संस्था म्हणून काम करते जी ग्रामीण रहिवाशांना नगरपालिका सेवा देते आणि जिल्हास्तरीय विकास उपक्रमांमध्ये भाग घेते.

## निष्कर्ष

जिल्हा परिषदा या अत्यावश्यक संस्था आहेत ज्या ग्रामीण भागाची सर्वांगीण प्रगती आणि कल्याण सुलभ करण्यासाठी विस्तृत कार्ये करतात. जिल्हा परिषदेची कार्ये विकास प्रकल्पांचे नियोजन आणि अंमलबजावणी, स्थानिक संसाधनांचे व्यवस्थापन आणि अत्यावश्यक सेवा प्रदान करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. नागरिकांचा सहभाग आणि तळागाळातील लोकशाहीला चालना देऊन, जिल्हा परिषदांची कार्ये स्थानिक रहिवाशांना निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत सक्रियपणे योगदान देण्यास सक्षम बनवतात, विकास उपक्रम लोकांच्या गरजा आणि आकांक्षांशी जुळतात याची खात्री करतात. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे आणि शाश्वत विकासासाठीच्या वचनबद्धतेमुळे, जिल्हा परिषदा सकारात्मक बदलासाठी, ते सेवा देत असलेल्या प्रदेशांमध्ये वाढ आणि समृद्धी आणण्याचे महत्त्वपूर्ण घटक आहेत.